सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ८२ ठ. क्र. ९८२ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



पूर्व भागातील पूर्व विभाग प्रमुख मानाचा ताता गणपती सांस्कृतिक मंडळ हे गेल्या ३० वर्षापासून गणेशोत्सवा बरोबर, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात काम करीत आहे. यामुळे पूर्व भागात या मंडळाचे आदराचे स्थान आहे. जोडबसवण्णा चौक येथील संसार स्टील सेंटर ते राजेंद्र चौक येथील कामगार कल्याण केंद्र मुख्य प्रवेशद्वारापर्यंत या रस्त्याला ताता गणपती मार्ग असे नामकरण करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~चालू~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ८3 ठ. क्र. 983
दि. १६/८/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



धर्मवीर वि. रा. पाटील या थोर समाज सुधारकांचा पुतळा किल्ला बाग येथील सावरकर पटांगण या ठिकाणी बसविणेकामी निर्णय घेण्यात आलेला होता. परंतू सदर ठिकाणी किल्लाबाग व हुतात्मा बागेचा परिसर असल्याने तसेच लोकांची वर्दळ मोठया प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे किल्ल्याजवळ सदरचा पुतळा बसविणे हे पुरातत्व खात्याच्या तत्वात बसणारे नसल्याने ही बाब कायदेशीर होणार नाही असे पुरातत्व खात्याचे मत आहे.

सबब धर्मवीर वि. रा. पाटील यांचा पुतळा वरील ठिकाणी बसविणे ऐवजी सावरकर उद्यान या ठिकाणी असलेल्या मैदान परिसरात बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सन्माननीय/तातडीची/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ८४ ठ. क्र. १४४
दि. १६/०८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



सौ. पुतळाबाई खाजप्पा शिंदे रा. सुशिलनगर विजापूर रोड सोलापूर यांना कॅन्सरचा आजार झाला असून, सदर आजारावर आजपर्यंत त्यांच्याकडून मोठा खर्च झालेला आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून, त्यांना या असाध्य अशा आजारावर औषधोपचार करणेकामी सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालि.

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूम/~~कामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ८६ ठ. क्र. ९८५
दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



प्रभाग क्र. २१ मध्ये टी.पी. १ फा.प्लॉट नं. ३० ही रिकामी जागा आहे. त्या जागेवर शाळेसाठी आरक्षण असून त्याचा क्रमांक ५-२३ असा आहे. या परिसरात आजूबाजूला शाळा असल्यामुळे परत त्या जागेवर शाळा बांधण्याची कांहीही गरज नाही. तेव्हा सदर जागेत शाळा बांधणे ऐवजी या परिसरातील तरुणांना क्रिडांगणाची जास्त गरज आहे. तेव्हा सदर जागेवरील शाळेचे आरक्षण रद्द करण्यांत यावे. त्या ठिकाणी क्रिडांगण तयार करणेत यावे. याकामी सदरील आरक्षित जागेवर शाळेऐवजी क्रिडांगण असा बदल करणेस व त्या आरक्षित जागेवर क्रिडांगण तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे ... ९० ठ. क्र. १४६ दि. १६/९/१६ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये प्र.क्र. ३७ अंतर्गत गीतानगर येथील ओपन स्पेस जागेवर विविध सुधारणा करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. ३७/२०१५-१६ र.रु. ५०,८७,१४४/- यांस व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे बजेट तरतूद उपलब्ध होऊन पूर्वगणनपत्रकास मा. उद्यान समिती मार्फत मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. मनपाची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १२-५-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. २ दि. २-६-२०१६ चे शिफारसीनुसार मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ११२, दिनांक १४-६-१६ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१६-१७ चे भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नविन बाग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९१ ठ. क्र. १४५ दि. १६/९/१६ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ५० मध्ये सिध्देश्वर नगर भाग-४,५ येथे पिण्याचे पाण्याची पाईप लाईन घालणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २०१५-१६ र.रु. ६,४६,३६३/- इतकेचे तयार केले असून सदरकामी येणारा खर्च सन २०१६-१७ चे भांडवली कामे करणे/ मा. शासन अनुदान या बजेट सदरातून र.रु. ६.५० लाख इतकी तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयक्त यांचे दि. ८-६-१६ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१६-१७ चे भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/उजनी पाकणी सोरेगांव भवानी पेठ येथे प्लो मिटर बसविणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९४ ठ. क्र. १४८
दि. २६/०९/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



स्मार्ट सिटी कंपनीच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव नमूद कारणास्तव सहयाद्री शॉपिंग सेंटर मधील पहिल्या मजल्यावरील हॉल हे आयकर विभागाकडे आहे. त्यांचे मुळ कार्यालय होटगी रोड येथे स्थलांतरीत झालेले आहे. त्यांच्या ताब्यात असलेले पहिल्या मजल्यावरील हॉलमधील सर्व रेकॉर्ड स्थलांतरीत करुन हॉलचा ताबा देणेबाबत संमती दर्शविलेली आहे. प्रस्तावात नमूद प्रमाणे संबंधितांकडून भाडे आकारणी केलेली आहे आणि नगर रचना यांनी दिलेले भाडे दरानुसार प्रती माहे भाडे हे ६५१X६९४ = र.रु. ४,५१,७९४/- इतके होत आहे. परंतू सदरचे कार्यालय (हॉल) हे महानगरपालिकेचाच एक भाग असून त्या जागेपोटी एस.पी.व्ही. कंपनी यांना प्रति माहे चौ. फुट र.रु. १०/- प्रमाणे ७००० चौ. फुट या मापाचे र.रु. ७०,०००/- रुपये आकारणी करुन उक्त नमूद हॉल भाडयाने द्यावे किंवा नगर रचना यांचेकडील सन २०१५ चे प्रती चौ.मी. र.रु. ६९४/- इतके दराप्रमाणे ७००० चौ.फुट म्हणजेच ६५१ चौ. मी. या जागेचे र.रु. ४,५१,७९४/- आकारणी करावे, याबाबतचे धोरण मा. सर्वसाधारण सभेने निश्चित करुन देणे व त्याअनुषंगाने सहयाद्री शॉपिंग सेंटर या ठिकाणी स्मार्ट सिटीचे कार्यालय स्थापित करणेस सहयाद्री शॉपिंग सेंटरमधील दुस-या मजल्यावरील हॉलची जागा ही स्मार्ट सिटी योजना अस्तित्वात असे पर्यंतच्या कालावधीकरिता देणे व भाडे निश्चिती करणेबाबत मा. सर्वसाधारण सभेचे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव तातडीने दि. २०-६-१६ रोजीचे होणारे मा. सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-६-१६ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/जादा/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९५ ठ. क्र. १४९ दि. १६/०९/२०१६ रोजी केलेल्या आलेल्या ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना राज्यस्तर अंतर्गत रस्ते विकास प्रकल्प मधील IR-४ a चेतन फौन्ड्री ते विठ्ठल मंदिर हा रस्ता समाविष्ठ होता. परंतू खा. सुशीलकुमार शिंदे यांच्या निधीतून नुकतेच हे काम करण्यात आलेले आहे. म्हणून या रस्त्याऐवजी प्र.क्र. ४९ मधील बॉम्बे पार्क ते सुभाष शहा नगर हा DP-१२ मिटर रस्ता करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

लातूर महानगरपालिकेच्या महापौर/...
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ ९६ ठ. क्र. १५०
दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवता पालीका बो. ...
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



नेहरु नगरच्या पुढे पूर्व बाजूला टाकळीकर मंगल कार्यालय व डी-मार्टकडे रस्ता जातो. तर दुस-या बाजूला पश्चिमेकडे अत्तार नगरास रस्ता जातो व सरळ रस्ता सोरेगांवकडे जातो. या चौकास **स्वामी विवेकानंद चौक** असे नामकरण करण्यांस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
लातूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कायमी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ८७ ठ. क्र. १५१
दि. १६/०६/२०१६ रोजी ठेवता [illegible]
[illegible]



श्री. बसवराज प्रताप तांबे वय ७० राहणार, विजापूर रोड सोलापूर यांना काविळचा विकार झाला असून त्यांच्यावर यशोधरा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, सोलापूर येथे उपचार घेतला आहे. श्री. बसवराज प्रताप तांबे यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखिची असल्याने त्यांना औषधोपचारासाठी सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.